**<u>नियमित फौजदारी खटला/334/2025</u>**

<u>महाराष्ट्र शासन वि. विरोचन प्रल्हाद तोटकर</u>

**MHLA090026772025**

## <u>निशाणी क्र.१ आणि २८ खालील आदेश</u>

आरोपी क्र.१ व २ यांनी सदरचा अर्ज हा दोषमुक्त म्हणून सोडण्यासाठी दाखल केलेला आहे.

अर्जदार यांच्या वतीने युक्तिवाद सादर करण्यात आला की, आरोपी यांच्या विरुद्ध अॅट्रॉसीटी अॅक्ट अंतर्गत असणारे आपराध तसेच भा.द.वी., कलम ५०४,५०६ अंतर्गत असणारे गुन्हे यापूर्वी मा.उच्च न्यायालयाने रद्द केले आहेत. आरोपी क्र.१ व २ यांच्या विरुद्ध आता भा.द.वी., ४४८ प्रमाणे दोषारोप प्रलंबित असून ते आकर्षित होत नसल्याने आरोपींना सोडण्यास विनंती केली.

विद्वान सरकरी वकील यांनी नि.क्र.२९ वर म्हणणे दाखल केले असून आपला विरोध प्रकट केला. विद्वान सरकारी वकीलांच्या म्हणण्याप्रमाणे संबंधीत अर्ज पाहाता आरोपींनी दुष्कृत्य केले असल्याचे फिर्यादवरून दिसत असल्याने अर्ज रद्द करण्यात यावा.

भा.द.वी., कलम ४४८ प्रमाणे आसणारे दोषारोप जर पाहले तर राहात्या वास्तुशी किंवा एखाद्या बांधीव क्षेत्राशी संबंधीत तो अपराध आहे. सदर केसच्या कामी उपलब्ध असणारी फिर्याद पाहाता घटनास्थळ ही खुली व

मोकळी जागा आहे. त्यामुळे भा.द.वी., कलम ४४८ प्रमाणे असणारे दोषारोप आकर्षित होत नाहीत. आरोपी क्र.१ व २ यांना त्यामुळे फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम २४५(१) प्रमाणे भा.द.वी., कलम ४४८ च्या दोषारोपातून दोषमुक्त म्हणून सोडून देण्यात येते व केस निकाली काढण्यात येते.

Digitally signed by VIJAY RAMCHANDRA GHARAL
Date: 2026.08.10 15:04:15 +0530

**ठिकाणः उदगीर** **(श्री. व्ही. आर. घराळ)**

**दि.१०/०८/२०२६** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, उदगीर.**